THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 3RD JULY 1890.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सन १८९० चा पालनकरणारे व वार्ड यांबाबद आक्ट.

अणुक्रमणिका.


बाब १.

प्रथमारंभींचे नियम.

कलमें.

१. सरनामा, व्याप्ति व सुरुवात.
२. रद्द करणें.
३. कोर्ट आफ् वार्ड व सनदी हे कोर्ट यांचा अधिकार कायम ठेवणें.
४. व्याख्या.

बाब २.

पालनकरणारे नेमणें व ठरविणें.

५. यूरोपीयन ब्रिटिश रैयतांच्या प्रसंगीं पालनकरणारे नेमण्याचा आईबापांचा अधिकार.
६. इतर प्रसंगीं पालनकरणारा नेमण्याचा अधिकार कायम ठेवणें.
७. पालनकरणाराच्या नेमणुकीबाबद हुकूम करण्याचा कोर्टाचा अधिकार.
८. हुकुमासाठीं अर्जी करण्याचा हक्क असलेलीं मनुष्यें.

कलमें.

९. अर्जी घेण्याचा अधिकार असणारें कोर्ट.
१०. अर्जीचा नमुना.
११. अर्जी घेतल्यावर काम चालविण्याची रीति.
१२. अल्पवयीमनुष्यास हजर करण्यासाठीं आणि त्याचें शरीर व मिळकत यांचें दर्म्यान संरक्षण करण्यासाठीं मध्यंतरीय हुकूम करण्याचा अधिकार.
१३. हुकूम करण्यापूर्वी पुरावा ऐकून घेणें.
१४. निरनिराळ्या कोर्टांत एकाच वेळीं काम चालविलें असेल तर.
१५. अनेक पालनकरणारे नेमणें अगर ठरविणें.
१६. कोर्टाच्या अधिकाराबाहेरील मिळकतीबद्दल पालनकरणारा नेमणें अगर ठरविणें.
१७. पालनकरणारा नेमतांना कोर्टानें ज्या गोष्टींचा विचार करणें त्या.
१८. कलेक्टरास हुद्याच्या नात्यानें पालनकरणारा नेमलें अगर ठरविलें असेल तेव्हां.
१९. कित्येक बाबतींत कोर्टानें पालनकरणारा न नेमणें.

कलमें.

## बाब ३.

### पालनकरणारांचीं कामें, हक्क व पात्रता.

सामान्य.

२०. पालनकरणाराचा वार्डाशीं विश्वासाचा संबंध.
२१. अल्पवयीमनुष्यांची पालनकरणाराचें काम करण्याची योग्यता.
२२. पालनकरणाराचा मेहनताना.
२३. कलेक्टरावर पालनकरणारा या नात्यानें निर्बंध.

शरीराचा पालनकरणारा.

२४. शरीराच्या पालनकरणाराचीं कामें.
२५. वार्डाच्या रखवालीविषयीं पालनकरणाराचा हक्क.
२६. अधिकाराच्या हद्दीबाहेर वार्डास नेणें.

मिळकतीचा पालनकरणारा.

२७. मिळकतीच्या पालनकरणाराचीं कामें.
२८. मृत्युपत्रांतील पालनकरणाराचे अधिकार.
२९. कोर्टानें नेमिलेला किंवा ठरविलेला मिळकतीचा पालनकरणारा याच्या अधिकारांची मर्यादा.
३०. कलम २८ अगर कलम २९ याविरुद्ध मिळकत दुसऱ्याच्या नांवीं करून दिली असेल ती रद्द होण्यास पात्र आहे.
३१. कलम २९ अन्वयें मिळकत दुसऱ्याच्या नांवीं करून देण्याच्या परवानगीबाबद वहिवाट.
३२. कोर्टानें नेमलेला अगर ठरविलेला मिळकतीचा पालनकरणारा याच्या अधिकारांत फेरफार.
३३. वार्डाच्या मिळकतीची व्यवस्था करण्यांत मत देण्यासाठीं कोर्टास अर्जी करण्याचा कोर्टानें नेमिलेल्या अगर ठरविलेल्या पालनकरणाराचा हक्क.
३४. मिळकतीचा पालनकरणारा कोर्टानें नेमला अगर ठरविला असेल त्यानें करावयाच्या गोष्टी.
३५. वहिवाटिबाबद खत घेतलें असेल त्या बाबतींत पालनकरणारावर दावा.

कलमें.

३६. वहिवाटबाबद खत घेतलें नसेल त्या बाबतींत पालनकरणारावर दावा.
३७. ट्रस्टी या नात्यानें पालनकरणाराची सामान्य पात्रता.

पालनकरणाराच्या कामाचा शेवट होणें.

३८. सामायिक पालनकरणारांमध्यें मागें जिवंत राहणाराचा हक्क.
३९. पालनकरणारास काढून टाकणें.
४०. पालनकरणाराची कामावरून सुटका करणें.
४१. पालनकरणाराचा अधिकार बंद होणें.
४२. मरण पावलेल्या, कामावरून सुटका केलेल्या अगर काढून टाकलेल्या पालनकरणाराच्या जागीं दुसरा नेमणें.

## बाब ४.

### पुरवणी ठराव.

४३. पालनकरणारांच्या वर्तणुकीचें किंवा त्यानीं चालविलेल्या कामांचें नियमन करण्यासाठीं हुकुम करणें, व हे हुकुम अमलांत आणणें.
४४. अधिकारांतून वार्डास बाहेर नेल्याबदल शिक्षा.
४५. दुराग्रहाबदल शिक्षा.
४६. कलेक्टरांकडून व ताब्यांतील कोर्टांकडून रिपोर्ट.
४७. ज्या हुकुमांवर अपील चालेल ते.
४८. इतर हुकुम अखेरचे समजणें.
४९. खर्च.
५०. कानू करण्याचा हे कोर्टास अधिकार.
५१. कोर्टाकडून आधींच नेमण्यांत आलेल्या पालनकरणारांस आक्ट लागू करणें.
५२. हिंदुस्तानचा व्यवहार्य वयासंबंधी आक्ट याची सुधारणा.
५३. सिव्हिल प्रोसीजर कोडाच्या ३१ व्या बाबीची सुधारणा.

परिशिष्ट.—कायदे रद्द केले ते.

हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आलीजनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २१ माहे मार्च सन १८९० रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असे:—

# सन १८९० चा आक्ट ८ वा.

पालनकरणारे व वार्ड यांसंबंधी कायदा एकत्र करून सुधारण्याविषयीं आक्ट

ज्यापेक्षां पालनकरणारे व वार्ड यांसंबंधी कायदा एकत्र करून सुधारणें योग्य आहे, त्यापेक्षां हल्लीं खालीं लिहिल्याप्रमाणें नवीन कायदा ठरावण्यात येत आहे :—

## बाब १.

### प्रथमारंभींचे नियम.

१. (१) ह्या आक्टास सन १८९० चा पालनकरणारे व वार्ड यांबाबद आक्ट असें ह्मणावें. सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

(२) तो, उत्तर ब्रह्मदेश व ब्रिटिश बलुचिस्तान धरून, सर्व ब्रिटिश इंडियास लागू आहे; आणि

(३) तो सन १८९० च्या जुलै महिन्याच्या पहिल्या तारखेस अमलांत येईल.

२. (१) सदहू तारखेस व त्या तारखेपासून परिशिष्टांत दिलेले कायदे, त्या परिशिष्टाच्या तिसऱ्या कोष्टकांत सांगितलें आहे तेथवर, रद्द केले आहेत असें समजावें. रद्द करणें.

(२) परंतु त्या कायद्यांपैकीं कोणत्याहि कायद्याअन्वयें चालविलेलीं कामें, दिलेले दाखले, नेमून दिलेलीं वेतनें, ठरविलेली कर्तव्यता आणि केलेल्या अर्ज्या, नेमणुका, हुकुम व कानू हीं सर्व कृत्यें, लागू होण्यासारखें असेल तेथवर, या आक्टाअन्वयें झालीं आहेत असें समजलें पाहिजे; आणि

(३) कोणत्याहि कायद्यांत किंवा दस्तऐवजांत सदहू कायद्यांपैकीं कोणत्याहि कायद्यावर हवाला दिला असेल तो, लागू होण्यासारखा असेल तेथवर, या आक्टावर किंवा या आक्टाच्या त्या त्या प्रकरणासंबंधी भागावर दिला आहे असें समजावें.

३. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं किंवा गव्हर्नर अगर लेफ्टिनेंट गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं कोणत्याहि कोर्ट आफ् वार्डच्या संबधानें यापूर्वीं किंवा यानंतर ठरविलेल्या प्रत्येक कायद्यास अनुसरून हा आक्ट वाचला पाहिजे; आणि या आक्टांतील कोणत्याहि ठरावावरून, कोणत्याहि कोर्ट आफ् वार्डच्या हुकुमतीस किंवा अधिकारास बाध येतो किंवा कोणत्याहि रीतीनें कमीपणा येतो असें, अगर व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दीच्या २४ व्या व २५ व्या वर्षांतील स्टाट्यूट, च्याप्टर १०४ (हिंदुस्तानांत न्यायाचीं हैं कोर्टें स्थापण्याविषयीं आक्ट) याअन्वयें स्थापलेल्या कोणत्याहि है कोर्टास असलेला कोणताहि अधिकार नाहींसा होतो असें समजूं नये. कोर्ट आफ् वार्ड व सनदी है कोर्टें यांचा अधिकार कायम ठेवणें.

४. या आक्टांत, विषयावरून किंवा संदर्भावरून बाध येत नसेल तर,— व्याख्या.

(१) "अल्पवयीमनुष्य" याचा अर्थ जें मनुष्य, हिंदुस्तानचा व्यवहार्यवयासंबंधी सन १८७५ चा आक्ट याच्या ठरावांप्रमाणें व्यवहार्यवयांत आलें नसेल तें मनुष्य असा समजावा :

(२) "पालनकरणारा" याचा अर्थ, अल्पवयीमनुष्याच्या शरीराचा किंवा त्याच्या मिळकतीचा किंवा त्याचें शरीर व मिळकत या दोहींचा संभाळ करण्याचें काम ज्या मनुष्याकडे असेल तो मनुष्य असा समजावा :

(३) "वार्ड" याचा अर्थ, ज्या अल्पवयीमनुष्याच्या शरीराबदल किंवा मिळकतीबदल किंवा त्या दोहींबदल पालनकरणारा असेल तें अल्पवयीमनुष्य असा समजावा:

(४) "डिस्ट्रिक्ट कोर्ट" या संज्ञेचा जो अर्थ सिविल प्रोसीजर कोडांत केला आहे तोच असून, त्या संज्ञेंत हैं कोर्ट आपला साधारण अवल दिवाणी अधिकार चालवीत असेल तेव्हां त्याचा समावेश होतो असें समजावें:

(५) "कोर्ट" ह्मणजे एकाद्या मनुष्यास पालनकरणारा नेमण्याचा अगर ठरविण्याचा हुकुम मिळण्याबदलची या आक्टाखालील अर्जी घेण्याचा अधिकार ज्या डिस्ट्रिक्ट कोर्टास असेल तें डिस्ट्रिक्ट कोर्ट असें समजावें; आणि, अशा कोणत्याहि अर्जीवरून पालनकरणारा नेमिलेला अगर ठरविलेला असेल त्या प्रसंगीं, कोर्ट याचा अर्थ, ज्या कोर्टानें त्या पालनकरणारास नेमिलें किंवा ठरविलें असेल तें कोर्ट असा, अगर वार्डाच्या शरीरासंबंधीं कोणत्याहि बाबतींत, जेथें तो वार्ड त्या त्या वेळीं साधारणतः राहत असेल त्या ठिकाणीं अधिकार असणारें डिस्ट्रिक्ट कोर्ट असा समजावा:

(६) "कलेक्टर" याचा अर्थ जिल्ह्याचा मुलकी कारभार पाहणारा मुख्य अमलदार असा असून, त्या शब्दांत, ज्या कोणत्याहि अमलदारास स्थानिक सरकार, सरकारी गॅझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, या आक्टाच्या सर्व किंवा कोणत्याहि कारणांसाठीं कोणत्याहि प्रदेशांत, किंवा कोणत्याहि वर्गाच्या मनुष्यांच्या संबंधानें, कलेक्टर ह्मणून त्याच्या नांवानें किंवा त्याच्या हुद्याच्या नात्यानें नेमील, त्या अमलदाराचा समावेश होतो असें समजावें:

(७) "यूरोपीयन ब्रिटिश रैयत" या संज्ञेचा अर्थ, सन १८८२ च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडांत तिची व्याख्या केल्याप्रमाणें असून, त्या संज्ञेंत यूरोपीयन उत्पत्तीच्या कोणत्याहि क्रिस्ती मनुष्याचा समावेश होतो असें समजावें: आणि

(८) "फर्माविलेलें" ह्मणजे या आक्टाअन्वयें हैं कोर्टानें केलेल्या कानूवरून फर्माविलेलें असें समजावें.

---

## बाब २.

### पालनकरणारे नेमणें व ठरविणें.

*यूरोपीयन ब्रिटिश रैयतांच्या प्रसंगीं पालनकरणारे नेमण्याचा आईबापांचा अधिकार.*

५. (१) जेव्हां अल्पवयीमनुष्य हा यूरोपीयन ब्रिटिश रैयत असेल तेव्हां त्याच्या शरीराचा किंवा मिळकतीचा किंवा त्या दोहींचा पालनकरणारा अगर पालनकरणारे नेमणें ते, नेमणाऱ्या मनुष्याच्या मरणानंतर अमलांत यावयाचा अशा मृत्युलेखावरून किंवा दुसऱ्या दस्तऐवजावरून,—

(अ) अल्पवयीमनुष्याचा बाप, किंवा

(ब) बाप मरण पावला असल्यास अगर काम पाहण्यास असमर्थ असल्यास आई,

नेमूं शकेल.

(२) जेव्हां पोट-कलम (१) अन्वयें पालनकरणारे आई व बाप या दोघांनींहि नेमिले असतील, तेव्हां अशा पालनकरणारांनीं एकत्र मिळून काम केलें पाहिजे.

*इतर प्रसंगीं पालनकरणारा नेमण्याचा अधिकार कायम ठेवणें.*

६. जेव्हां अल्पवयीमनुष्य हा यूरोपीयन ब्रिटिश रैयत नसेल तेव्हां, त्याच्या शरीराचा किंवा मिळकतीचा किंवा त्या दोहींचा पालनकरणारा नेमण्याचा जो कोणताहि अधिकार अशा अल्पवयीमनुष्यास लागू असणाऱ्या कायद्यावरून रास्त असेल तो या आक्टांतील कोणत्याहि ठरावावरून नाहींसा होतो किंवा त्यास कमीपणा येतो असें समजूं नये.

पालनकरणाराच्या नेमणुकीबाबद हुकुम करण्याचा कोर्टाचा अधिकार.

७. (१) जेव्हां कोर्टाची अशी खातरी होईल कीं खालीं लिहिलेल्या गोष्टींबाबद, ह्मणजे—

(अ) कोणत्याहि अल्पवयीमनुष्याच्या शरीराचा किंवा मिळकतीचा किंवा त्या दोहींचा पालनकरणारा नेमण्याबाबद, किंवा

(ब) एकाद्या मनुष्यास असा पालनकरणारा ह्मणून ठरविण्याबाबद,

हुकुम करणें हें अशा अल्पवयीमनुष्याच्या कल्याणाचें आहे, तेव्हां कोर्टास त्याप्रमाणें हुकुम करण्याचा अधिकार आहे.

(२) या कलमाअन्वयें हुकुम झाला ह्मणजे त्यावरून, जो कोणताहि पालनकरणारा मृत्युलेखावरून अगर इतर दस्तऐवजावरून नेमलेला नसेल किंवा कोर्टानें नेमलेला अगर ठरविलेला नसेल तो कामावरून दूर होतो असें समजावें.

(३) जेव्हां पालनकरणारा मृत्युलेखावरून अगर इतर दस्तऐवजावरून नेमलेला किंवा कोर्टानें नेमलेला अगर ठरविलेला असेल त्या प्रसंगीं, त्याच्या जागीं दुसऱ्या मनुष्यास पालनकरणारा नेमण्याविषयीं अगर ठरविण्याविषयीं या कलमाअन्वयें हुकुम, सदरीलप्रमाणें नेमलेल्या अगर ठरविलेल्या पालनकरणाराचे अधिकार या आक्टाच्या ठरावांअन्वयें बंद होत तोंपर्यंत, करतां कामा नये.

हुकुमासाठीं अर्जी करण्याचा हक्क असलेलीं मनुष्यें.

८. सदरील शेवटच्या कलमाअन्वयें हुकुम करणें तो फक्त पुढील मनुष्यांच्या अर्जीवरून मात्र करावा. तीं मनुष्यें येणेंप्रमाणें:—

(अ) अल्पवयमिनुष्याचा पालनकरणारा होऊं इच्छिणारा, अगर त्याचा पालनकरणारा असल्याबद्दल दावा सांगणारा मनुष्य, किंवा

(ब) अल्पवयीमनुष्याचा कोणताहि नातलग अगर इष्टमित्र, किंवा

(क) ज्या जिल्ह्यांत किंवा दुसऱ्या प्रदेशांत अल्पवयीमनुष्य साधारणतः राहत असेल अगर ज्यांत त्याची मिळकत असेल त्या जिल्ह्याचा किंवा प्रदेशाचा कलेक्टर, किंवा

(ड) अल्पवयमिनुष्य ज्या वर्गांतील असेल त्या वर्गाच्या संबंधानें अधिकार असणारा कलेक्टर.

अर्जी घेण्याचा अधिकार असणारें कोर्ट.

९. (१) अर्जी करणें ती अल्पवयमिनुष्याच्या शरीराच्या पालनासंबंधी असल्यास, जेथें अल्पवयीमनुष्य साधारणतः राहत असेल त्या ठिकाणीं अधिकार असणाऱ्या डिस्ट्रिक्ट कोर्टास केली पाहिजे.

(२) जर अर्जी अल्पवयीमनुष्याच्या मिळकतीच्या पालनासंबंधी असेल तर ती, जेथें अल्पवयीमनुष्य साधारणतः राहत असेल त्या ठिकाणीं अधिकार असणाऱ्या डिस्ट्रिक्ट कोर्टास, किंवा त्याची मिळकत असेल तशा एकाद्या ठिकाणीं अधिकार असणाऱ्या डिस्ट्रिक्ट कोर्टास करण्याचा अधिकार आहे.

(३) जर अल्पवयीमनुष्याच्या मिळकतीच्या पालनासंबंधींची अर्जी, जेथें तो अल्पवयीमनुष्य साधारणतः राहत असेल त्या ठिकाणीं अधिकार असणारें डिस्ट्रिक्ट कोर्ट खेरीज करून इतर डिस्ट्रिक्ट कोर्टास केली असेल तर, अधिकार असणाऱ्या कोणत्याहि दुसऱ्या डिस्ट्रिक्ट कोर्टाकडून त्या अर्जीचा अधिक न्यायानें किंवा सोईवार रीतीनें निकाल करण्यांत येईल असें त्या कोर्टास वाटल्यास ती अर्जी परत करण्यास तें कोर्ट मुखत्यार आहे.

अर्जीचा नमुना.

१०. (१) सदहू अर्जी कलेक्टरानें केलेली नसल्यास, ती अर्जीच्या रूपानें केलेली असली पाहिजे आणि तींत पुढील मजकूर, कळण्यासारखा असेल तितका लिहून, तिजवर, फिर्यादअर्जीवर सही करण्याची व खरेपणाचा प्रतिज्ञा लेख लिहि-

ण्याची सिव्हिल प्रोसीजर कोडांत रीति सांगितली आहे त्या रीतीनें सही केली पाहिजे व तसा प्रतिज्ञालेख लिहिला पाहिजे. तो मजकूर येणेंप्रमाणें:—

(अ) अल्पवयीमनुष्याचें नांव, पुरुष किंवा स्त्री तें, त्याचा धर्म, जन्माची तारीख व नेहमीचें राहण्याचें ठिकाण;

(ब) अल्पवयीमनुष्य स्त्री असल्यास ती विवाहित आहे कीं काय तें, व असल्यास तिच्या नवऱ्याचें नांव व वय;

(क) अल्पवयीमनुष्याची कांहीं मिळकत असल्यास ती कोणत्या प्रकारची आहे, कोठें आहे व तिची अजमासें किंमत काय आहे तें;

(ड) अल्पवयीमनुष्याच्या शरिराची किंवा मिळकतीचा रखवाली किंवा कबजा ज्याकडे आहे त्या मनुष्याचें नांव व राहण्याचें ठिकाण;

(ई) अल्पवयीमनुष्याचे जवळचे नातलग कोण आहेत, आणि ते कोठें राहतात तें;

(फ) अल्पवयीमनुष्याच्या शरीराच्या किंवा मिळकतीच्या किंवा त्या दोहींच्या पालनकरणाराची नेमणूक करण्यास त्या अल्पवयीमनुष्यास लागू असणाऱ्या कायद्यावरून अधिकार असणाऱ्या किंवा तसा अधिकार असल्याबद्दल हक्क सांगणाऱ्या कोणत्याहि मनुष्यानें अशी एकादी नेमणूक केली आहे किंवा कसें तें;

(ग) अल्पवयीमनुष्याच्या शरीराच्या किंवा मिळकतीच्या किंवा त्या दोहींच्या पालनासंबंधीं अर्जी त्याच कोर्टास किंवा कोणत्याहि दुसऱ्या कोर्टास कोणत्याहि वेळीं केलेली आहे किंवा कसें तें, आणि केलेली असल्यास, केव्हां केली होती, कोणत्या कोर्टास केली होती व तिचा निकाल कसा झाला तें;

(ह) अर्जी करण्यांत येत असेल ती, अल्पवयीमनुष्याच्या शरीराचा किंवा मिळकतीचा किंवा त्या दोहींचा पालनकरणारा नेमण्याबद्दल आहे किंवा ठरविण्याबद्दल आहे तें;

(आय्) जेव्हां अर्जी पालनकरणारा नेमण्याविषयीं असेल, तेव्हां योजिलेल्या पालनकरणाराची लायकी काय आहे तें;

(जे) जेव्हां अर्जी एकाद्या मनुष्यास पालनकरणारा ठरविण्याविषयीं असेल, तेव्हां अशा मनुष्यास हक्क सांगण्यास कोणत्या सबबी आहेत तें;

(के) अर्जी करण्यास कोणतीं कारणें झालीं तें; आणि

(ल) फर्माविलेला असेल तसा किंवा अर्जीच्या स्वरूपाप्रमाणें जो लिहिणें अवश्य असेल तसा दुसरा कोणताहि मजकूर असल्यास तो.

(२) अर्जी कलेक्टरानें केलेली असल्यास, ती कोर्टाच्या नांवें पत्राच्या रूपानें लिहून टपाल मार्फत किंवा सोईवार दिसेल तशा इतर रीतीनें रवाना केली पाहिजे, आणि पोट-कलम (१) यांत सांगितलेला मजकूर दाखल करतां येईल तितका केला पाहिजे.

(३) अर्जीसोबत, योजलेला पालनकरणारा पालनकरण्याचें काम पतकरण्यास राजी असल्याबदलचा इकरार असला पाहिजे व त्या इकरारावर त्याची सही असून निदान दोन साक्षी असल्या पाहिजेत.

अर्जी घेतल्यावर काम चालविण्याची रीति.

११. (१) अर्जीवर काम चालविण्यास आधार आहे अशी कोर्टाची खातरी होईल तर, त्या कोर्टानें तिच्या चौकशीसाठीं एक दिवस नेमिला पाहिजे आणि त्या अर्जीची व चौकशीसाठीं नेमिलेल्या तारखेची नोटीस—

(अ) सिव्हिल प्रोसीजर कोडांत फर्माविलेल्या रीतीनें—

(१) अल्पवयीमनुष्याचीं आईबापें ब्रिटिश इंडियांत राहत असल्यास त्यांजवर,

(२) अल्पवयीमनुष्याचें शरीर अगर मिळकत अमुक मनुष्याच्या रखवालींत अगर कबजांत आहे ह्मणून सदर्हू अर्जांत अगर पत्रांत सांगितलेलें असल्यास त्या मनुष्यावर,

(३) पालनकरणारा ह्मणून नेमण्याविषयीं अगर ठरविण्याविषयीं सदर्हू अर्जांत अगर पत्रांत सुचविलेला मनुष्य हा स्वतः अर्जदार नसल्यास त्या मनुष्यावर, आणि

(४) ज्या दुसऱ्या कोणत्याहि मनुष्यास अशा अर्जाची विशेष नोटीस द्यावी असें कोर्टास वाटेल त्या मनुष्यावर,

बजावविली पाहिजे; आणि

(ब) कोर्टाच्या इमारतीच्या व अल्पवयीमनुष्याच्या राहण्याच्या जागेच्या कोणत्या तरी प्रसिद्ध भागावर लावविली पाहिजे, व या आक्टाअन्वयें हैं कोर्टानें ज्या कोणत्याहि कानू केल्या असतील त्यांस अनुसरून कोर्टास योग्य वाटेल तशा इतर रीतीनें प्रसिद्ध करविली पाहिजे.

(२) जेव्हां, कलम १०, पोट-कलम (१) याअन्वयें केलेल्या अर्जांत वर्णन दिलेल्या मिळकतीचा कोणताहि भाग जमीन असून तिची देखरेख एकादें कोर्ट आफ् वार्ड् यास आपणाकडे घेतां येईल तेव्हांहि, अल्पवयीमनुष्य ज्या कलेक्टराच्या जिल्ह्यांत साधारणतः राहत असेल त्या कलेक्टरावर आणि सदर्हू जमिनीचा कोणताहि अंश ज्या ज्या कलेक्टराच्या जिल्ह्यांत असेल त्या प्रत्येक कलेक्टरावर, वर लिहिल्या प्रकारची नोटीस कोर्टानें बजावविली पाहिजे असें सामान्य किंवा विशेष हुकुमाच्या द्वारें फर्माविण्याचा स्थानिक सरकारास अख्त्यार आहे, आणि अशा कलेक्टरास योग्य वाटेल तशा कोणत्याहि रीतीनें ती नोटीस प्रसिद्ध करविण्यास तो कलेक्टर मुखत्यार आहे.

(३) पोट-कलम (२) अन्वयें बजावावयाची अगर प्रसिद्ध करावयाची कोणतीहि नोटीस बजाविल्याबद्दल अगर प्रसिद्ध केल्याबद्दल कोर्टानें अगर कलेक्टरानें कोणताहि खर्च मागूं नये.

अल्पवयीमनुष्यास हजर करण्यासाठीं आणि त्याचें शरीर व मिळकत यांचे दर्म्यान संरक्षण करण्यासाठीं मध्यंतरीय हुकुम करण्याचा अधिकार.

१२. (१) अल्पवयीमनुष्याच्या रखवालीचें काम ज्याकडे आहे असा कोणी मनुष्य असल्यास त्यानें कोर्ट नेमील तशा जागीं व वेळीं व तशा मनुष्यापुढें त्यास हजर करावें असें फर्माविण्याचा, आणि दर्म्यान हंगामी मुदतीपर्यंत अल्पवयीमनुष्याच्या शरीराची किंवा मिळकतीची रखवाली व संरक्षण करण्यासाठीं आपणास योग्य वाटेल तसा हुकुम करण्याचा कोर्टास अधिकार आहे.

(२) अल्पवयीमनुष्य स्त्री असून तिला चारचौघांत हजर करण्याविषयीं हुकुम देतां येत नाहीं असें असेल तर, तिला हजर करण्याबद्दल पोट-कलम (१) याअन्वयें जो हुकुम करावयाचा त्यांत, तिला देशाच्या चालीं व रिवाज यांबरहुकूम हजर करण्याविषयीं फर्माविलें पाहिजे.

(३) या कलमांतील कोणत्याहि ठरावावरून—

(अ) कोर्टास, कोणत्याहि अल्पवयी स्त्रीस दर्म्यान हंगामी मुदतीपर्यंत रखवालींत देणें तें, आपण तिचा नवरा असल्या सबबीनें तिचा पालनकरणारा ह्मणून हक्क सांगत आहे अशा कोणत्याहि मनुष्याच्या रखवालींत ती, तिचीं आईबापें असल्यास त्यांच्या संमतीनें अगोदरच नसेल तर, अशा मनुष्याच्या रखवालींत देण्याचा, किंवा

(ब) अल्पवयीमनुष्याच्या मिळकतीच्या रखवालीचें व संरक्षणाचें काम दर्म्यान हंगामी मुदतीपर्यंत ज्या मनुष्याकडे सोंपलें असेल त्यास, अशा मिळकतीपैकीं कोणतीहि मिळकत कोणत्याहि मनुष्याच्या ताब्यांत असेल ती त्याजकडून कायद्याच्या योग्य मार्गाखेरीज इतर रीतीनें घेण्याचा, अधिकार प्राप्त होतो असें समजूं नये.

हुकुम करण्यापूर्वी पुरावा ऐकून घेणें.

१३. अर्जीच्या चौकशीसाठीं नेमिलेल्या दिवशीं किंवा त्यानंतर होईल तितक्या लौकर कोर्टानें, त्या अर्जीच्या पुष्टीकरणार्थ किंवा तिच्या विरुद्ध जो पुरावा हजर करण्यांत येईल तो ऐकून घेतला पाहिजे.

निरनिराळ्या कोर्टांत एकाच वेळीं काम चालविलें असेल तर.

१४. (१) अल्पवयीमनुष्याचा पालनकरणारा नेमण्याबद्दल अगर ठरविण्याबद्दल काम एकाहून अधिक कोर्टांत चालविलें असेल तर, त्या कोर्टांपैकीं दरेकानें दुसऱ्या कोर्टांत अगर कोर्टांमध्यें चाललेल्या कामाची खबर लागल्यावर, आपणापुढें चाललेलें काम बंद ठेविलें पाहिजे.

(२) जर अशीं दोन्ही किंवा सर्व कोर्टें एकाच हैकोर्टाच्या ताब्यांत असतील तर त्यांनीं त्या प्रकरणाबद्दल अशा हैकोर्टास रिपोर्ट केला पाहिजे, आणि त्या हैकोर्टानें, सदरील अल्पवयीमनुष्याचा पालनकरणारा नेमण्याच्या अगर ठरविण्याच्या संबंधानें काम सदरील पैकीं कोणत्या कोर्टांत चालावें याबद्दल निर्णय केला पाहिजे.

(३) पोट-कलम (१) अन्वयें ज्या कोणत्याहि दुसऱ्या प्रसंगीं काम बंद ठेविलें असेल तेव्हां कोर्टांनीं त्या प्रकरणाचा रिपोर्ट स्थानिक सरकारामार्फत गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस केला पाहिजे, आणि मग गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे, सदरील अल्पवयीमनुष्याचा पालनकरणारा नेमण्याच्या अगर ठरविण्याच्या संबंधानें काम सदरीलपैकीं कोणत्या कोर्टांत चालावें याबद्दल निर्णय करतील.

अनेक पालनकरणारे नेमणें अगर ठरविणें.

१५. (१) अल्पवयीमनुष्यास जो कायदा लागू असेल त्या कायद्यावरून त्याच्या शरीराचे किंवा मिळकतीचे, किंवा त्या दोहींचे, दोन किंवा अधिक सामायिक पालनकरणारे असण्याची मोकळीक असेल तर, कोर्टास योग्य वाटल्यास तें कोर्ट असे पालनकरणारे नेमण्यास किंवा ठरविण्यास मुखत्यार आहे.

(२) यूरोपीयन ब्रिटिश रैयत असणाऱ्या ज्या बापानें, आपल्या मरणानंतर अमलांत यावयाचा अशा मृत्युलेखावरून किंवा दुसऱ्या दस्तऐवजावरून आपल्या अल्पवयी मुलाचा पालनकरणारा नेमला आहे त्या बापाच्या मरणानंतर कोर्टास, त्या मुलाच्या आईला त्याचीं बापानें नेमलेल्या पालनकरणाराबरोबर सामायिक पालनकरणारी नेमण्याचा अधिकार आहे.

(३) यूरोपीयन ब्रिटिस रैयत असणाऱ्या ज्या आईनें, आपल्या मरणानंतर, अमलांत यावयाचा अशा मृत्युलेखावरून किंवा दुसऱ्या दस्तऐवजावरून एकाद्या मनुष्यास, आपल्या अल्पवयी मुलाचा बाप असमर्थ असल्या मुदतींत, त्या मुलाचा पालनकरणारा नेमिला आहे त्या आईच्या मरणानंतर कोर्टास, तो बाप काम पाहण्यालायक झाला असल्यास, कोर्टाला योग्य वाटेल त्याप्रमाणें, त्या बापास त्या मुलाचा एकटाच पालनकरणारा नेमण्याचा किंवा आईनें नेमिलेल्या पालनकरणाराबरोबर त्याचा सामायिक पालनकरणारा नेमण्याचा अधिकार आहे.

(४) अल्पवयीमनुष्याच्या शरीराचे आणि त्याच्या मिळकतीचे निरनिराळे पालनकरणारे नेमण्याचा किंवा ठरविण्याचा अधिकार आहे.

(५) जर अल्पवयीमनुष्याच्या अनेक मिळकती असतील तर, कोर्टास योग्य वाटल्यास, तें कोर्ट त्या मिळकतींपैकीं कोणत्याहि एका किंवा अधिक मिळकतींबद्दल निरनिराळा पालनकरणारा नेमण्यास किंवा ठरविण्यास मुखत्यार आहे.

कोर्टाच्या अधिकाराबाहेरील मिळकतीबद्दल पालनकरणारा नेमणें अगर ठरविणें.

१६. जर कोर्ट आपल्या अधिकाराच्या स्थलसीमांच्या बाहेर असलेल्या कोणत्याहि मिळकतीबद्दल एकादा पालनकरणारा नेमील किंवा ठरवील तर, जेथें ती मिळकत असेल त्या ठिकाणीं अधिकार असणाऱ्या कोर्टानें, त्यास असा पालनकरणारा नेमण्याबाबदच्या अगर ठरविण्याबाबदच्या हुकुमाची दाखलेसूद नक्कल हजर केल्यावर, त्याला योग्य रीतीनें नेमिला किंवा ठरविला असल्याप्रमाणें कबूल केलें पाहिजे आणि तो हुकुम अमलांत आणला पाहिजे.

पालनकरणारा नेमतांना कोर्टानें ज्या गोष्टींचा विचार करणें त्या.

१७. (१) अल्पवयीमनुष्याचा पालनकरणारा नेमतांना किंवा ठरवितांना कोर्टानें, त्या अल्पवयीमनुष्याला लागू असणाऱ्या कायद्यास अनुरूप अशा ज्या गोष्टी त्या त्या वेळच्या स्थितिमानावरून त्या अल्पवयीमनुष्याच्या कल्याणाच्या दिसतील त्यांचें धोरण राखून, व या कलमांतील ठराव लागू राहून, काम चालविलें पाहिजे.

(२) कोणत्या गोष्टी अल्पवयीमनुष्याच्या कल्याणाच्या होतील याचा विचार करतांना, त्याचें वय, जाति व धर्म, योजिलेल्या पालनकरणाराची वर्तणूक कशी आहे व योग्यता काय आहे तें आणि त्याचें अल्पवयीमनुष्याशीं किती जवळचें नातें आहे तें, या गोष्टींकडे, आणि तसेंच, त्याच्या आईबापांपैकीं कोणी एकादें मरण पावलेलें असल्यास त्याची इच्छा काय आहे आणि त्या अल्पवयीमनुष्याशीं किंवा त्याच्या मिळकतीशीं योजिलेल्या पालनकरणाराचा त्या वेळीं कोणताहि संबंध असल्यास तो कसा आहे किंवा त्यापूर्वीं असल्यास तो कसा होता या गोष्टींकडे कोर्टानें लक्ष्य पुरविलें पाहिजे.

(३) अल्पवयीमनुष्य समंजस रीतीनें पालनकरणाराची निवड करण्यासारख्या वयाचा असेल, तर कोर्टास त्यानें केलेल्या निवडीचा विचार करण्याचा अधिकार आहे.

(४) आईबापें यूरोपीयन ब्रिटिश रैयत असून अल्पवयीमनुष्याच्या शरीराच्या पालनाच्या कामाविषयीं एकमेकांविरुद्ध दावा सांगत असतील त्या प्रसंगीं, त्या दोघांतून कोणालाच हक्कानें ह्मणून तें काम मिळणार नाहीं; परंतु, अशा प्रसंगीं इतर गोष्टी समसमान असून, अल्पवयीमनुष्य अगदीं लहान मुलगा असेल तर किंवा तें मनुष्य मुलगी असेल तर असें अल्पवयीमनुष्य आईकडे द्यावें, आणि जर अल्पवयीमनुष्य, ज्या वयांत विद्या संपादन करणें व मेहनत आणि काम करण्यास तयार होणें अवश्य असतें अशा वयाचा मुलगा असेल, तर त्याला बापाकडे द्यावें.

(५) कोर्टानें कोणत्याहि मनुष्यास त्याच्या इच्छेविरुद्ध पालनकरणारा नेमूं अगर ठरवूं नये.

कलेक्टरास हुद्याच्या नात्यानें पालनकरणारा नेमलें अगर ठरविलें असेल तेव्हां.

१८. जेव्हां कोर्टानें कलेक्टरास, त्याच्या हुद्याच्या नात्यानें अल्पवयीमनुष्याच्या शरीराचा अगर मिळकतीचा किंवा त्या दोहींचा पालनकरणारा नेमिलें अगर ठरविलें असेल तेव्हां त्याला नेमण्याबाबदच्या अगर ठरविण्याबाबदच्या हुकुमावरून, त्या त्या वेळीं सदर्हू हुद्यावर असणाऱ्या मनुष्यास, प्रसंगाप्रमाणें, अल्पवयीमनुष्याचें शरीर अगर मिळकत यांच्या किंवा त्या दोहींच्या पालनासंबंधीं काम पाहण्याचा अधिकार प्राप्त होतो व तें काम पाहणें अवश्य होतें असें समजावें.

किल्येक बाबतींत कोर्टानें पालनकरणारा न नेमणें.

१९. या बाबींतील कोणत्याहि ठरावावरून कोर्टास, कोर्ट आफ् वार्ड याच्या देखरेखीखालीं ज्याची मिळकत आहे अशा अल्पवयीमनुष्याच्या मिळकतीचा, किंवा—

(अ) जें अल्पवयीमनुष्य विवाहित स्त्री असून जिचा नवरा कोर्टाच्या मतें तिच्या शरीराच्या पालनाचें काम करण्यास अयोग्य नसेल त्या अल्पवयीमनुष्याच्या, किंवा

(ब) यूरोपीयन ब्रिटिश रैयतेबाबदचे या आक्टांतील ठराव लागू राहून, ज्या अल्पवयीमनुष्याचा बाप जिवंत असून ज्याच्या शरीराच्या पालनाचें काम करण्यास कोर्टाच्या मतें तो अयोग्य नसेल त्या अल्पवयीमनुष्याच्या, किंवा

(क) ज्या अल्पवयीमनुष्याची मिळकत, अशा अल्पवयीमनुष्याच्या शरीराचा पालनकरणारा नेमण्याचा अधिकार असणाऱ्या कोर्ट आफ् वार्ड्च्या देखरेखीखालीं असेल त्या अल्पवयीमनुष्याच्या—

शरीराचा पालनकरणारा नेमण्याचा अगर ठरविण्याचा अधिकार येतो असें समजूं नये.

---

## बाब ३.

### पालनकरणारांचीं कामें, हक्क व पात्रता.

सामान्य.

**पालनकरणाराचा वार्डाशीं विश्वासाचा संबंध.**

२०. (१) पालनकरणाराचा त्याच्या वार्डाशीं जो संबंध तो विश्वासाचा होय असें समजावें, आणि त्याची नेमणूक कोणत्याहि मृत्युलेखाअन्वयें अगर दुसऱ्या दस्तऐवजाअन्वयें झालेली असल्यास त्यावरून अगर या आक्टावरून ठरविलें असेल त्याखेरीज इतर रीतानें त्यानें आपल्या हुद्यापासून कोणताहि नफा करून घेतां कामा नये.

(२) हा पालनकरणाराचा त्याच्या वार्डाशीं जो विश्वासाचा संबंध तो, पालनकरणाराकडून आपल्या वार्डाच्या आणि वार्डाकडून आपल्या पालनकरणाराच्या मिळकतीच्या ज्या खरेद्या, तो वार्ड वयांत आल्यानंतर लागलीच किंवा लवकरच झाल्या असतील त्यांस, आणि साधारणपणें, पालनकरणाराचें वजन जोंपर्यंत चालू राहील किंवा जुनें झालेलें नसेल तोंपर्यंत, त्यांच्या दर्म्यान झालेल्या सर्व व्यवहारांस लागू होतो व बाधक होतो असें समजावें.

**अल्पवयीमनुष्यांची पालनकरणाराचें काम करण्याची योग्यता.**

२१. कोणताहि अल्पवयीमनुष्य, आपली स्वतःची बायको अगर मूल यांखेरीज, किंवा तो अविभक्त हिंदू कुटुंबांतील व्यवस्था पाहणारा असामी असल्यास, त्या कुटुंबांतील दुसऱ्या अल्पवयी असामीची बायको अगर मूल यांखेरीज इतर कोणत्याहि अल्पवयीमनुष्याचा पालनकरणारा होऊं सकत नाहीं असें समजावें.

**पालनकरणाराचा मेहनताना.**

२२. (१) कोर्टानें नेमलेल्या अगर ठरविलेल्या पालनकरणारास आपलीं कामें बजाविण्यांमध्यें जी काळजी घ्यावी लागेल व जी मेहनत होईल त्यांबद्दल कांहीं वेतन ठरविणें कोर्टास योग्य वाटल्यास तेवढें मिळण्याचा त्या पालनकरणारास हक्क प्राप्त होईल.

(२) जेव्हां सरकारचा एकादा अमलदार, सरकारी अमलदार या नात्यानें, कोर्टाकडून पालनकरणारा नेमिला अगर ठरविला जाईल तेव्हां, स्थानिक सरकार सामान्य किंवा विशेष हुकुम करून फर्मावील ती फी वार्डाच्या मिळकतींतून सरकारास दिली पाहिजे.

**कलेक्टरावर पालनकरणारा या नात्यानें निर्बंध.**

२३. जेव्हां कोर्टानें एकाद्या कलेक्टरास अल्पवयीमनुष्याच्या शरीराचा अगर मिळकतीचा किंवा त्या दोहींचा पालनकरणारा नेमिला अगर ठरविला असेल तेव्हां तो, आपल्या वार्डाच्या पालनासंबंधी सर्व गोष्टींत, स्थानिक सरकारच्या किंवा

त्यासाठीं तें सरकार सरकारी गॅझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून नेमील तशा अधिकाराच्या निर्बंधास पात्र असेल.

### शरीराच्या पालनकरणारा.

२४. वार्डाच्या शरीराच्या पालनकरणाराकडे वार्डाच्या रखवालीचें काम असेल, आणि त्यानें त्याचें प्रतिपालन, आरोग्य व शिक्षण यांकडे आणि वार्डास लागू असणाऱ्या कायद्यावरून ज्या दुसऱ्या गोष्टी अवश्य असतील त्यांकडे लक्ष दिलें पाहिजे. शरीराच्या पालनकरणाराचीं कामें.

२५. (१) कोणताहि वार्ड आपल्या शरीराच्या पालनकरणाराच्या रखवालींतून निघून गेलेला अगर काढून नेलेला असून, त्यानें आपल्या पालनकरणाराच्या रखवालींत परत जाणें हें त्याच्या कल्याणाचें आहे असें कोर्टास वाटेल तर, त्या वार्डानें त्याप्रमाणें परत जाण्याबद्दल हुकुम करण्याचा, आणि असा हुकुम अमलांत आणण्याच्या कारणासाठीं त्या वार्डास धरवून सदर्हू पालनकरणाराच्या रखवालींत देवविण्याचा कोर्टास अधिकार आहे. वार्डाच्या रखवालीविषयीं पालनकरणाराचा हक्क.

(२) वार्डास धरण्याच्या कारणासाठीं कोर्टास, सन १८८२ च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाचें कलम १०० यावरून पहिल्या वर्गाच्या माजिस्ट्रेटास जो अधिकार दिलेला आहे तो चालविण्याचा अखत्यार आहे.

(३) आपला पालनकरणारा नव्हे अशा मनुष्याबरोबर आपल्या पालनकरणाराच्या इच्छेविरुद्ध वार्ड राहिला म्हणून तेवढ्यानेंच त्या पालनकरणाराच्या नेमणुकीचा शेवट होतो असें समजूं नये.

२६. (१) कोर्टानें नेमलेला अगर ठरविलेला शरीराचा पालनकरणारा हा कलेक्टर किंवा मृत्युलेखावरून अगर दुसऱ्या दस्तऐवजावरून नेमलेला पालनकरणारा नसेल तर त्यानें, ज्या कोर्टानें त्यास नेमिलें अगर ठरविलें त्या कोर्टाच्या परवानगीवांचून, वार्डास त्या कोर्टाच्या अधिकाराच्या हद्दीबाहेर, सांगितलेल्या कारणांखेरीज इतर कारणांकरितां, नेतां कामा नये. अधिकाराच्या हद्दीबाहेर वार्डास नेणें.

(२) पोट-कलम (१) याअन्वयें कोर्टानें द्यावयाची जी परवानगी ती विशेष किंवा सामान्य देण्याचा, आणि ती ज्या हुकुमावरून दिली असेल त्या हुकुमांत तिची इयत्ता ठरविण्याचा अधिकार आहे.

### मिळकतीचा पालनकरणारा.

२७. वार्डाच्या मिळकतीच्या पालनकरणारानें त्या मिळकतीच्या संबंधानें, ती एकाद्या साधारण विचारी मनुष्याची स्वतःची असती तर तो जितक्या काळजीनें तिच्यासंबंधानें वागता, तितक्याच काळजीनें वागणें अवश्य आहे, आणि या बाबींतील ठराव लागू राहून, त्यास, सदर्हू मिळकतीच्या वसुलातीकरितां, संरक्षणाकरितां अगर हिताकरितां जीं कृत्यें वाजवी व योग्य असतील तीं सर्व करण्याचा अधिकार आहे. मिळकतीच्या पालनकरणाराचीं कामें.

२८. पालनकरणारा मृत्युलेखावरून अगर दुसऱ्या दस्तऐवजावरून नेमलेला असेल त्या प्रसंगीं, त्याच्या वार्डाची स्थावर मिळकत गहाण ठेवणें अगर तिजवर बोजा घालणें, किंवा विक्रीनें, देणगीनें, मोबदल्यानें अगर इतर रीतीनें ती दुसऱ्याच्या नांवीं करून देणें याबाबदच्या सदर्हू पालनकरणाराच्या अधिकारास, सदर्हू मृत्युलेखावरून अगर दुसऱ्या दस्तऐवजावरून केलेला कोणताहि निर्बंध लागू राहील असें समजावें: मात्र त्यास या आक्टाअन्वयें पालनकरणारा म्हणून ठरविलेलें असून याप्रमाणें ठरविणाऱ्या कोर्टानें त्याला, सदर्हू निर्बंध न जुमानतां, लेखी हुकुमाच्या द्वारें, अशा हुकुमांत सांगितलेल्या कोणत्याहि स्थावर मिळकतीची त्या हुकुमांत सांगितलेल्या मृत्युपत्रांतील पालनकरणाराचे अधिकार.

रीतीनें व्यवस्था करण्याची परवानगी दिली असेल तर, सदरीलप्रमाणें निर्बंध लागू राहणार नाहीं.

कोर्टानें नेमिलेला किंवा ठरविलेला मिळकतीचा पालनकरणारा याच्या अधिकारांची मर्यादा.

२९. कलेक्टराखेरीज अगर मृत्युलेखावरून किंवा दुसऱ्या दस्तऐवजावरून नेमलेल्या पालनकरणाराखेरीज इतर मनुष्यास जेव्हां वार्डाच्या मिळकतीचा पालनकरणारा कोर्टानें नेमिला किंवा ठरविला असेल, तेव्हां त्यानें कोर्टाची पूर्वी परवानगी घेतल्यावांचून—

(अ) आपल्या वार्डाच्या स्थावर मिळकतीचा कोणताहि भाग गहाण ठेवूं नये अगर त्यावर बोजा घालूं नये, किंवा तो विक्रीनें, देणगीनें, मोबदल्यानें किंवा इतर रीतीनें दुसऱ्याच्या नांवीं करून देऊं नये, किंवा

(ब) पांच वर्षांहून अधिक मुदतीपर्यंत किंवा ज्या तारिखेस वार्ड वयांत येईल त्या तारिखेपुढें एक वर्षाहून अधिक अशा कोणत्याहि मुदतीपर्यंत सदहू मिळकतीचा कोणताहि भाग पट्ट्यानें देऊं नये.

कलम २८ अगर कलम २९ याविरुद्ध मिळकत दुसऱ्याच्या नांवीं करून दिली असेल ती रद्द होण्यास पात्र आहे.

३०. सदरील शेवटच्या दोन कलमांपैकीं कोणत्याहि कलमाविरुद्ध पालनकरणारानें स्थावर मिळकतीची व्यवस्था केली असल्यास व ती दुसऱ्या कोणत्याहि मनुष्यास बाधक होत असून त्यानें तक्रार केल्यास, ती रद्द होण्यास पात्र आहे असें समजावें.

कलम २९ अन्वयें मिळकत दुसऱ्याच्या नांवीं करून देण्याच्या परवानगीबाबद वहिवाट.

३१. (१) २९च्या कलमांत सांगितलेल्या कृत्यांतून कोणतेंहि कृत्य करण्याची पालनकरणारास परवानगी देणें ती, फक्त जरूरीच्या प्रसंगाखेरीज किंवा वार्डाचा उघड फायदा असेल त्या बाबतीखेरीज इतर प्रसंगीं कोर्टानें देऊं नये.

(२) सदहू परवानगी देण्याविषयींच्या हुकुमांत, प्रसंगाप्रमाणें, जो जरूरीचा प्रसंग किंवा फायदा असेल तो लिहिला पाहिजे, जें कृत्य करण्यास परवानगी दिली असेल तें कृत्य ज्या मिळकतीच्या संबंधानें करावयाचें त्या मिळकतीचें वर्णन दिलें पाहिजे, आणि त्या परवानगीस कांहीं शर्ती जोडणें कोर्टास योग्य वाटल्यास, त्याहि लिहिल्या पाहिजेत; आणि तो हुकुम कोर्टाच्या जज्जानें स्वदस्तुर लिहून त्यावर स्वतः तारीख घातली पाहिजे व आपली सही केली पाहिजे, किंवा, कोणत्याहि कारणामुळें त्याला तो हुकुम स्वदस्तुर लिहितां येत नसेल तेव्हां मजकूर स्वतः सांगून तो हुकुम लिहविला पाहिजे आणि त्यावर त्यानें स्वतः तारीख घालून आपली सही केली पाहिजे.

(३) सदहू परवानगीस कोर्टानें ज्या शर्ती जोडावयाच्या त्यांमध्यें त्याच्या नजरेस येईल त्याप्रमाणें खालीं दिलेल्या शर्ती जोडण्यास तें कोर्ट मुखत्यार आहे. त्या शर्ती येणेंप्रमाणें :—

(अ) मिळकतीची विक्री करणें ती कोर्टाच्या मंजुरीवांचून पुरी करूं नये;

(ब) मिळकत विकणें ती, या आक्टाअन्वयें हे कोर्टानें ज्या कोणत्याहि कानू केल्या असतील त्या कानूंस अनुसरून कोर्ट फर्मावील तसा योजिलेल्या विक्रीचा जाहिरनामा प्रसिद्ध केल्यानंतर, कोर्टापुढें किंवा त्या कारणासाठीं कोर्टानें मुद्दाम नेमिलेल्या कोणत्या तरी मनुष्यापुढें, कोर्टानें नेमलेल्या वेळीं व जागीं, जाहीर लिलावानें, मोठ्यांतमोठी रकम बोलणारास विकली पाहिजे;

(क) पट्टा करणें तो मनोती घेऊन करूं नये, किंवा तो, कोर्ट फर्मी-वील तितक्या वर्षांच्या मुदतीपर्यंतचा व तशा भाड्यांच्या व करा-रांच्या शर्तीनें केला पाहिजे;

(ड) जें कृत्य करण्यास परवानगी दिली असेल त्या कृत्यापासून होणारें सगळें उत्पन्न किंवा त्याचा कोणताहि भाग पालनकरणारानें कोर्टांत भरला पाहिजे, व कोर्ट फर्मावील त्याप्रमाणें त्यांतून खर्च केला पाहिजे अगर फर्माविलेल्या सिक्युरिटींवर कोर्टानें व्याजीं लाविला पाहिजे किंवा इतर रीतीनें त्याची व्यवस्था केली पाहिजे.

(४) २९ व्या कलमांत सांगितलेलें एकादें कृत्य करण्याची पालनकरणारास परवानगी देण्यापूर्वी, त्या परवानगीबद्दल केलेल्या अर्जीची नोटीस वार्डाच्या ज्या कोणत्याहि नातलगास किंवा इष्टमित्रास मिळावी असें कोर्टास वाटेल त्या नातलगास किंवा इष्टमित्रास ती देवविण्यास कोर्ट मुखत्यार आहे, आणि त्या कोर्टानें त्या अर्जी-विरुद्ध तकरार करण्यास जो कोणताहि मनुष्य हजर होईल त्याचें ह्मणणें ऐकून घेऊन त्यानें सांगितलेला मजकूर लिहून घेतला पाहिजे.

३२. जेव्हां वार्डाच्या मिळकतीचा पालनकरणारा कोर्टानें नेमिलेला किंवा ठर-विलेला असून तो कलेक्टर नसेल, तेव्हां जी रीत व जी मर्यादा वार्डाच्या फायद्याची आहे व वार्डास लागू असणाऱ्या कायद्यास अनुरूप आहे असें कोर्टास वाटेल त्या रीतीनें व त्या मर्यादेपर्यंत वार्डाच्या मिळकतीसंबंधीं अशा पालनकरणाराचे अधिकार वेळोवेळीं, हुकुम करून, ठरविण्यास, कमी करण्यास किंवा वाढविण्यास कोर्ट मुख-त्यार आहे.

कोर्टानें नेमलेला अगर ठर-विलेला मिळकतीचा पालनकर-णारा याच्या अधिकारांत फेर-फार.

३३. (१) कोर्टानें नेमिलेल्या अगर ठरविलेल्या पालनकरणारास, आपल्या वार्डाच्या मिळकतीच्या व्यवस्थेसंबंधीं किंवा कारभारासंबंधीं कोणत्याहि विद्यमान तकरारबिाबद आपणास नेमणाऱ्या अगर ठरविणाऱ्या कोर्टाचें मत, सल्ला किंवा हुकुम त्या कोर्टास अर्ज करून मागण्याचा अधिकार आहे.

वार्डाच्या मिळकतीची व्यव-स्था करण्यांत मत देण्यासाठीं कोर्टास अर्जी करण्याचा कोर्टानें नेमिलेल्या अगर ठरविलेल्या पा-लनकरणाराचा हक्क.

(२) सदर्हू तकरारीचा संक्षिप्त रीतीनें निकाल करणें कोर्टास योग्य वाटेल तर, सदर्हू मागणीशीं संबंध असलेल्या मनुष्यांतून कोर्टास योग्य वाटेल तशा मनुष्यांस सदर्हू अर्जाची नकल त्यानें पोहंचविली पाहिजे, व तशा मनुष्यांस त्या अर्जाच्या चौकशीच्या वेळीं हजर असण्याचा अधिकार आहे.

(३) पालनकरणारानें वास्तविक असतील त्या गोष्टी अर्जांत प्रामाणिकपणा नें लिहिल्या आणि कोर्टानें दिलेल्या मतास, सल्ल्यास किंवा हुकुमास अनुसरून तो वागला ह्मणजे अर्जांतील विषयाच्या संबंधानें त्यानें आपलें पालनकरणाराच्या नात्याचें काम बजाविलें आहे असें, त्याच्या स्वतःच्या जबाबदारीपुरतें, मानलें पाहिजे.

३४. जेव्हां वार्डाच्या मिळकतीचा पालनकरणारा कोर्टानें नेमिला किंवा ठरवि-ला असून तो कलेक्टर नसेल तेव्हां त्यानें,—

मिळकतीचा पालनकरणारा कोर्टानें नेमला अगर ठरविला असेल त्यानें करावयाच्या गोष्टी.

(अ) कोर्टानें हुकुम केला असतां, त्या कोर्टाच्या जज्जाच्या नांवें, वेळोवेळीं असणाऱ्या जज्जास उपयोग करतां येईल असें, व होईल तितक्या री-तीनें फर्माविलेल्या नमुन्याप्रमाणें असणारें असें एक खत, फर्मावि-लेलें असेल त्याप्रमाणें जामिनांनिशीं किंवा जामिनांवांचून, वार्डाच्या मिळकतीच्या संबंधानें जें कांहीं त्याच्याकडे येईल त्याचा योग्य रीतीनें हिशोब देण्याचा त्यांत करार नमूद करून, लिहून दिलें पाहिजे;

(ब) कोर्टानें हुकुम केला असतां, कोर्टानें त्यास नेमल्याच्या किंवा ठरविल्याच्या तारखेपासून साहा महिन्यांचे आंत, किंवा कोर्ट फर्मावील तशा दुसऱ्या मुदतीचे आंत, पुढील प्रकारचें एक पत्रक कोर्टास दिलें पाहिजे, ह्मणजे वार्डाची स्थावर मिळकत, तें पत्रक दिल्याच्या तारखेपर्यंत वार्डासाठीं ह्मणून त्याच्याकडे आलेला पैका व इतर जंगम मिळकत, व वार्डास किंवा वार्डाकडून त्या तारखेस देणें असलेलीं कर्जे यांचें एक पत्रक दिलें पाहिजे;

(क) कोर्टानें हुकुम केला असतां, कोर्ट वेळोवेळीं फर्मावील तशा वेळीं व तशा नमुन्याप्रमाणें कोर्टांत आपले हिशोब दाखविले पाहिजेत;

(ड) कोर्टानें हुकुम केला असतां, त्या हिशोबांअन्वयें त्याकडून येणें असलेली बाकी, किंवा कोर्ट फर्मावील तेवढा तिचा भाग, कोर्ट फर्मावील त्या वेळीं कोर्टांत भरला पाहिजे; आणि

(ई) वार्डाचा व त्याजवर अवलंबून असणाऱ्या मनुष्यांचा निर्वाह, विद्याभ्यास व वढती यांकडे, व जे संस्कार त्या वार्डाच्या अगर त्या मनुष्यांपैकीं कोणत्याहि मनुष्याच्या संबंधाचे असतील ते करण्याकडे वार्डाच्या मिळकतीच्या उत्पन्नाचा कोर्ट वेळोवेळीं फर्मावील तो भाग, आणि कोर्ट फर्मावील तर, ती सगळी मिळकत किंवा तिचा कोणताहि भाग, लावला पाहिजे.

वहिवाटीबाबद खत घेतलें असेल त्याबाबतींत पालनकरणारावर दावा.

३९. जेव्हां कोर्टानें नेमलेल्या अगर ठरविलेल्या पालनकरणारानें आपल्या वार्डाच्या मिळकतीच्या संबंधानें आपणाकडे जें कांहीं येईल त्याचा योग्य रीतीनें हिशोब देण्याबाबद खत लिहून दिलें असेल तेव्हां कोर्टास, अर्ज आल्यावर व त्या खतांतील करार पाळलेला नाहीं अशी खात्री झाल्यावर आणि, कोर्टास योग्य वाटेल त्याप्रमाणें, तारणाबाबद अटी ठरवून, किंवा मिळालेला पैका कोर्टांत भरावा असा ठराव करून किंवा इतर रीतीनें, तें खत कोणत्या तरी योग्य मनुष्याकडे सोंपून देण्याचा अधिकार आहे; व त्यानंतर, तें खत कोर्टाच्या जज्जाच्या नांवें लिहून देण्याबदला मूळचेंच त्या मनुष्याच्या नांवें लिहून दिलेलें असल्याप्रमाणें त्याच्या स्वतःच्या नांवानें त्या खतावरून दावा करण्याचा त्या मनुष्याला हक्क मिळेल असें समजावें, आणि तसेंच त्या मनुष्यास वार्डाचा ट्रस्टी या नात्यानें त्या खतांतील कोणताहि करार तोडल्याबदल जी रकम वसूल करण्याजोगी असेल ती त्या खतावरून वसूल करण्याचाहि हक्क मिळेल असें समजावें.

वहिवाटीबाबद खत घतल नसेलत्याबाबतींत पालनकरणारावर दावा.

४०. (१) जेव्हां वर लिहिल्याप्रकारचें खत कोर्टानें नेमलेल्या अगर ठरविलेल्या पालनकरणारानें दिलेलें नसेल तेव्हां, कोणताहि मनुष्य इष्टमित्र ह्मणून, कोर्टाच्या परवानगीनें, वार्डाचें अल्पवय चालू असतांना कोणत्याहि वेळीं, व वर लिहिल्या प्रकारच्या शर्तींवर, पालनकरणाराविरुद्ध किंवा, तो मरण पावला असल्यास, त्याच्या वारश्याविरुद्ध, वार्डाच्या मिळकतीच्या संबंधानें पालनकरणाराकडे जें कांहीं आलें असेल त्याच्या हिशोबासाठीं दावा मांडण्यास मुखत्यार आहे, आणि जी रकम, प्रसंगाप्रमाणें, सदहू पालनकरणारा अगर त्याचा वारचा याकडून येणें असल्याबदल दिसून येईल ती रकम, वार्डाचा ट्रस्टी या नात्यानें त्यास त्या दाव्यांत वसूल करण्याचा अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) यांतील ठराव पालनकरणारावरील दाव्यासंबंधीं असतील तेथवर त्यांस, या आक्टावरून सुधारलेल्या सिव्हिल प्रोसीजर कोडाच्या ४४० व्या कलमांतील ठराव लागू राहतील असें समजावें.

३७. ज्याविषयीं सदरील शेवटच्या दोन्ही कलमांत स्पष्टपणें ठराव केलेला नसेल असा जो कोणताहि उपाय, दुसऱ्या कोणत्याहि वास्तविक हिताचा उपभोग घेणाऱ्या मालकास किंवा त्याच्या वारच्यास त्याच्या ट्रस्टीविरुद्ध किंवा त्या ट्रस्टीच्या वारच्याविरुद्ध असता, तो वार्डास किंवा त्याच्या वारच्यास आपल्या पालनकरणाराविरुद्ध किंवा त्या पालनकरणाराच्या वारच्याविरुद्ध, त्या दोन्हि कलमांतील कोणत्याहि ठरावावरून नाहींसा होतो असें समजूं नये.

ट्रस्टी या नात्यानें पालनकरणाराची सामान्य पात्रता.

### पालनकरणाराच्या कामाचा शेवट होणें.

३८. दोन किंवा अधिक सामायिक पालनकरणारांतून एकादा मरण पावला असतां त्यांचें काम, कोर्ट दुसऱ्या कोणाची नेमणूक करी तोंपर्यंत, मागें जिवंत राहणाऱ्या पालनकरणाराकडे किंवा पालनकरणारांकडे चालू राहील.

सामायिक पालनकरणारांमध्यें मागें जिवंत राहणाराचा हक्क.

३९. कोर्टास, संबंध असलेल्या कोणत्याहि मनुष्याच्या अर्जीवरून, किंवा स्वतः आपण होऊन, कोर्टानें नेमलेल्या अगर ठरविलेल्या किंवा मृत्युलेखावरून अगर इतर दस्तऐवजावरून नेमलेल्या पालनकरणाराला खालीं लिहिलेल्या कारणांतून कोणत्याहि कारणाबद्दल काढून टाकण्याचा अधिकार आहे, ह्मणजे,—

पालनकरणारास काढून टाकणें.

(अ) त्यानें आपल्या जिम्म्याचा गैरउपयोग केल्याबद्दल;

(ब) आपल्या जिम्म्याचीं कामें करण्यास तो नेहमी चुकत गेल्याबद्दल;

(क) आपल्या जिम्म्याचीं कामें करण्यास तो असमर्थ असल्याबद्दल;

(ड) आपल्या वार्डास वाईट रीतीनें वागविल्याबद्दल अगर त्याची योग्य काळजी घेण्यास हयगय केल्याबद्दल;

(ई) या आक्टांतील कोणत्याहि ठरावाकडे अगर कोर्टाच्या कोणत्याहि हुकुमाकडे दुराग्रहानें दुर्लक्ष्य केल्याबद्दल;

(फ) त्याजवर कांहीं अपराधाची शाबिती होऊन त्यामुळें त्याच्या योग्यतेस, आपल्या वार्डाच्या पालनाचें काम करण्यास नालायक होण्यासारखा कमीपणा येतो असें कोर्टास वाटल्यास, तशा शाबितीबद्दल;

(ग) आपलीं कामें इमानानें करण्यास प्रतिकूळ असा त्याचा हितसंबंध असल्याबद्दल;

(ह) कोर्टाच्या अधिकाराच्या स्थलसीमेच्या आंत राहण्याचा बंद झाल्याबद्दल;

(आय्) मिळकतीच्या पालनकरणाराच्या प्रसंगीं, दिवाळें निघाल्याबदल अगर नादारीबद्दल;

(जे) अल्पवयीमनुष्यास लागू असणाऱ्या कायद्याअन्वयें, पालनकरणाराच्या कामाची मुदत संपल्याकारणानें किंवा संपण्यास पात्र असल्याकारणानें:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं मृत्युलेखावरून अगर इतर दस्तऐवजावरून नेमलेला पालनकरणारा, तो मग या आक्टाअन्वयें ठरविलेला असो किंवा नसो त्याला,—

(अ) रकम (ग) मध्यें सांगितलेला प्रतिकूळ हितसंबंध त्यास नेमणाऱ्या मनुष्याच्या मरणानंतर उत्पन्न झालेला असल्याखेरीज, किंवा असा प्रतिकूळ हितसंबंध असल्याचें माहीत नसून त्या मनुष्यानें ती नेमणूक केली व चालविली असें दाखविण्यांत आल्याखेरीज, तशा संबंधाबद्दल, किंवा

(ब) रकम (ह) मध्यें सांगितल्याप्रमाणें तो कोर्टाच्या अधिकाराच्या स्थलसीमेबाहेर राहत असून त्यामुळें पालनकरणाराचीं कामें करणें त्याला साधण्यासारखें नाहीं असें कोर्टास वाटल्य खेरीज, त्याप्रमाणें राहत असल्याबद्दल,

काढून टाकतां कामा नये.

पालनकरणाराची कामावरून सुटका करणें.

४०. (१) जर कोर्टानें नेमलेल्या अगर ठरविलेल्या पालनकरणाराची आपल्या कामाचा राजीनामा देण्याची इच्छा असेल, तर तो आपली कामावरून सुटका होण्यासाठीं कोर्टास अर्जी करण्यास मुखत्यार आहे.

(२) जर सदहू अर्जी करण्याला पुरतें कारण आहे असें कोर्टास दिसून येईल, तर त्यानें त्याची कामावरून सुटका केली पाहिजे; आणि अशी अर्जी ज्या पालनकरणारानें केली असेल तो कलेक्टर असून त्याची अर्जी स्थानिक सरकारास मान्य होईल, तर कोर्टानें कोणत्याहि प्रसंगीं त्याची कामावरून सुटका केली पाहिजे.

पालनकरणाराचा अधिकार बंद होणें.

४१. (१) शरीराच्या पालनकरणाराचे अधिकार खालीं सांगितलेल्या कारणावरून बंद होतात असें समजावें, ह्मणजे,—

(अ) तो मरण पावल्यावरून, त्याला काढून टाकल्यावरून किंवा त्याची कामावरून सुटका केल्यावरून;

(ब) वार्डाच्या शरीराच्या देखरेखीचें काम कोर्ट आफ् वार्ड्‌यानें आपणाकडे घेतल्यावरून;

(क) वार्ड वयांत आल्यावरून;

(ड) वार्ड स्त्री असेल त्या प्रसंगीं, तिच्या शरीराचें पालन करण्यास अयोग्य नाहीं अशा नवऱ्याशीं तिचें लग्न झाल्यावरून किंवा, पालनकरणारा कोर्टानें नेमिला अगर ठरविला असल्यास, सदरील कामास कोर्टाच्या मतें अयोग्य नाहीं अशा नवऱ्याशीं तिचें लग्न झाल्यावरून; किंवा

(ई) ज्या वार्डाचा बाप त्याच्या शरीराचें पालन करण्याच्या कामास अगोदर अयोग्य असेल त्या वार्डाच्या प्रसंगीं, तो बाप त्या कामास योग्य झाला असल्यावरून, किंवा तो बाप याप्रमाणें अयोग्य असें कोर्टानें मानलेलें असल्यास, तो कोर्टाच्या मतें योग्य झाला असल्यावरून.

(२) मिळकतीच्या पालनकरणाराचे अधिकार खालीं लिहिलेल्या कारणावरून बंद होतात असें समजावें, ह्मणजे,—

(अ) तो मरण पावल्यावरून, त्याला काढून टाकल्यावरून किंवा त्याची कामावरून सुटका केल्यावरून;

(ब) वार्डाच्या मिळकतीच्या देखरेखीचें काम कोर्ट आफ् वार्ड यानें आपणाकडे घेतल्यावरून; किंवा

(क) वार्ड वयांत आल्यावरून.

(३) जेव्हां कोणत्याहि कारणावरून पालनकरणाराचे अधिकार बंद होतील तेव्हां त्याला, किंवा तो मयत झाला असल्यास त्याच्या वारसाला, वार्डाची जी कोणतीहि मिळकत, किंवा वार्डाच्या पूर्वींच्या किंवा विद्यमान मिळकतीसंबंधी जे कोणतेहि हिशेब त्याच्या कबजांत किंवा ताब्यांत असतील ते कोर्ट फर्मावील त्याप्रमाणें स्वाधीन करण्याविषयीं हुकुम करण्याचा कोर्टास अधिकार आहे.

(४) जेव्हां तो सदई मिळकत अगर हिशेब कोर्टानें हुकुम केल्याप्रमाणें स्वाधीन करील तेव्हां, मागाहून कोणतीहि दगलबाजी दिसून आल्यास तिच्या संबंधानें खेरीज करून, तो आपल्या ज़बाबदारीपासून मुक्त झाला असल्याबद्दल ठराव करण्यास कोर्ट मुखत्यार आहे.

मरण पावलेल्या, कामावरून सुटका केलेल्या अगर काढून टाकलेल्या पालनकरणाराच्या जागीं दुसरा नेमणें.

४२. जेव्हां कोर्टानें नेमलेल्या अगर ठरविलेल्या पालनकरणाराची कामावरून सुटका केली असेल, किंवा वार्डास लागू असणाऱ्या कायद्याअन्वयें त्याचा काम पाहण्याचा अधिकार बंद होईल, किंवा अशा कोणत्याहि पालनकरणारास अगर मृत्युलेखावरून अगर इतर दस्तऐवजावरून नेमलेल्या पालनकरणारास काढून टाकलें असेल अगर तो मरण पावला असेल, तेव्हां कोर्टाला, वार्ड तावत्कालपर्यंत अल्पवयी असल्यास, आपण होऊन किंवा बाब २ अन्वयें अर्जी आल्यावरून, प्रसंगाप्रमाणें, त्याच्या शरीराचा किंवा मिळकतीचा अगर त्या दोहींचा दुसरा पालनकरणारा नेमण्याचा अगर ठरविण्याचा अधिकार आहे.

---

## बाब ४.

### पुरवणी ठराव.

पालनकरणारांच्या वर्तणुकीचें किंवा त्यांनीं चालविलेल्या कामांचें नियमन करण्यासाठीं हुकम करणें, व हे हुकुम अमलांत आणणें.

४३. (१) कोर्टानें नेमलेल्या अगर ठरविलेल्या कोणत्याहि पालनकरणाराच्या वर्तणुकीचें किंवा त्यानें चालविलेल्या कामांचें नियमन करण्याविषयीं कोर्टास, हितसंबंध असलेल्या कोणत्याहि मनुष्याच्या अर्जीवरून किंवा स्वतः आपण होऊन, हुकुम करण्याचा अधिकार आहे.

(२) जेव्हां वार्डाचे पालनकरणारे एकाहून अधिक असून त्याच्या कल्याणासंबंधींच्या एकाद्या प्रकरणीं त्यांचें एक मत होऊं सकत नसेल तेव्हां, त्यांपैकीं कोणत्याहि असामीला हुकुमाकरितां कोर्टास अर्जी करण्याचा अधिकार आहे, आणि सदई मतभेदाच्या गोष्टीविषयीं आपणास योग्य वाटेल तसा हुकुम देण्यास कोर्ट मुख्त्यार आहे.

(३) पोट-कलम (१) अगर पोट-कलम (२) याअन्वयें हुकुम करण्याचा उद्देश विलंब झाल्यानें सिद्धीस जाणार नाहीं असें दिसून येईल त्या बाबती खेरीज करून इतर प्रसंगीं कोर्टानें असा हुकुम करण्यापूर्वीं, प्रसंगाप्रमाणें, अशा हुकुमाबदल केलेल्या अर्जीची किंवा तसा हुकुम करण्याविषयींच्या आपल्या इराद्याची नोटीस, पोट-कलम (१) याखालील बाबतींत पालनकरणारास, किंवा पोट-कलम (२) याखालील बाबतींत, ज्या पालनकरणारानें अर्जी केली नसेल त्या पालनकरणारास देण्याविषयीं फर्माविलें पाहिजे.

(४) पोट-कलम (१) अगर पोट-कलम (२) याअन्वयें केलेला एकादा हुकुम पाळला नसेल त्या प्रसंगीं पोट-कलम (१) याखालील बाबतींत, वार्ड हा वादी आणि पालनकरणारा हा प्रतिवादी, किंवा पोट-कलम (२) याखालील बाबतींत, अर्जी करणार पालनकरणारा हा वादी आणि दुसरा पालनकरणारा हा प्रतिवादी असल्याप्रमाणें, सिव्हिल प्रोसीजर कोडाच्या ४९२ व्या कलमाअन्वयें किंवा ४९३ व्या कलमाअन्वयें दिलेली ताकीद ज्या रीतीनें अमलांत आणण्यांत येते त्याच रीतीनें तो हुकुम अमलांत आणण्याचा अधिकार आहे.

(५) पोट-कलम (२) याखालील बाबतींत मात्र खेरीज करून, या कलमांतील कोणताहि ठराव, कलेक्टर या नात्यानें पालनकरणारा असणाऱ्या कलेक्टरास लागू होत नाहीं असें समजावें.

अधिकारांतून वार्डास बाहेर नेल्याबद्दल शिक्षा.

४४. वार्डाच्या संबंधानें कोर्टास आपला अधिकार चालवितां येऊं नये अशासाठीं किंवा अशा रीतीनें, कोर्टानें नेमलेला अगर ठरविलेला पालनकर-णारा जर वार्डास २६ व्या कलमांतील ठरावांविरुद्ध कोर्टाच्या अधिकाराच्या हद्दीं-तून बाहेर नेईल तर, तो कोर्टाच्या हुकुमावरून पराकाष्ठा एक हजार रुपयांपर्यंत दंडास किंवा दिवाणी तुरुंगांत पराकाष्ठा सहा महिन्यांच्या मुदतीपर्यंत कैद भोगण्यास पात्र होईल असें समजावें.

दुराग्रहाबद्दल शिक्षा.

४५. (१) जर पुढीलप्रमाणें असेल, ह्मणजे,—

(अ) ज्या मनुष्याकडे अल्पवयमिनुष्याची रखवाली असेल तो त्याला कलम १२, पोट-कलम (१) याखालील हुकुमाप्रमाणें हजर कर ण्यास अगर करविण्यास, किंवा अल्पवयमिनुष्यास कलम २५, पोट-कलम (१) याखालील हुकुमाअन्वयें त्याच्या पालनकरणा-राच्या रखवालींत परत जाण्याचें भाग पाडण्याविषयीं आपल्याच्या-नें होईल तितका प्रयत्न करण्यास चुकेल, किंवा

(ब) कोर्टानें नेमलेला अगर ठरविलेला पालन-करणारा कोर्टास, ३४व्या कलमाच्या (ब) रकमेवरून अगर त्या रकमेअन्वयें नेमलेल्या मुद-तींत, त्या रकमेअन्वयें मागितलेलें पत्रक देण्यास, किंवा त्या कल-माच्या (क) रकमेखालील हुकुमाप्रमाणें हिशेब दाखविण्यास, किंवा त्या हिशेबांअन्वयें त्याकडून येणें बाकी त्या कलमाच्या (ड) रक-मेखालील हुकुमाप्रमाणें कोर्टांत भरण्यास चुकेल, किंवा

(क) पालनकरणारा असण्याचा बंद झाला असेल असा मनुष्य, किंवा अशा मनुष्याचा वारसा, कोणतीहि मिळकत अगर हिशेब कलम ४१, पोट-कलम (३) याखालील हुकुमाप्रमाणें स्वाधीन कर-ण्यास चुकेल,

तर, प्रसंगाप्रमाणें, सदहू मनुष्य, पालनकरणारा अगर वारसा, कोर्टाच्या हुकुमांवरून पराकाष्ठा शंभर रुपयांपर्यंत दंडास, आणि कोर्टाचा हुकुम न पाळल्यास पहिल्या दिवसा-नंतर जितके दिवस त्या हुकुमाची अवज्ञा करण्यांत येईल त्यांपैकीं दरेकाबद्दल पराकाष्ठा दहा रुपयांपर्यंत आणखी जादा दंडास, व एकंदरींत पराकाष्ठा पांचशें रुपयांपर्यंत दंडास, पात्र होईल आणि तसेंच, सदरील अल्पवयीमनुष्यास हजर करण्याचें अगर करविण्याचें, किंवा त्यास वर सांगितल्याप्रमाणें रखवालींत परत जाण्यास भाग पाडण्याचें, किंवा सदरील पत्रक देण्याचें, किंवा हिशेब दाखविण्याचें, किंवा बाकी भरण्याचें, किंवा प्रसंगा-प्रमाणें, मिळकत अगर हिशेब स्वाधीन करण्याचें त्याजकडून कबूल करण्यांत येईं तोंपर्यंत दिवाणी तुरुंगांत अटकेंत ठेविला जाण्यासहि पात्र होईल असें समजावें.

(२) पोट-कलम (१) अन्वयें कबुलपत्र लिहून दिल्यावर ज्या कोणत्याहि मनुष्यास अटकेंतून सोडून दिलें असल, तो जर कोर्टानें दिलेल्या मुदतीच्या आंत ती कबुली अमलांत आणण्यास चुकला, तर त्याला धरवून परत दिवाणी तुरुंगांत पाठ-विण्यास कोर्ट मुखत्यार आहे.

कलेक्टरांकडून व ताब्यांतलि कोर्टांकडून रिपोर्ट.

४६. (१) कोर्टास, कलेक्टराला किंवा त्या कोर्टाच्या ताब्यांतील कोणत्याहि कोर्टाला, या आक्टाअन्वयें कोणत्याहि चालविलेल्या कामांत उपस्थित होणाऱ्या कोणत्याहि बाबतीवर रिपोर्ट करण्यास फर्माविण्याचा व तो रिपोर्ट पुराव्यादाखल मानण्याचा अधिकार आहे.

(२) सदरील रिपोर्ट तयार करण्याच्या कारणासाठीं, प्रसंगाप्रमाणें, कले-क्टरानें किंवा ताब्यांतलि कोर्टाच्या जज्जानें आपणास जरूर वाटेल तशी चौकशी

केली पाहिजे, आणि त्यास अशा चौकशीच्या कारणांसाठीं, साक्ष देण्याकरितां अगर एकादा दस्तऐवज हजर करण्याकरितां एकाद्या साक्षीदारास हजर होण्याचें भाग पाडण्याबदलचा जो कोणताहि अधिकार सिव्हिल प्रोसीजर कोडावरून एकाद्या कोर्टास दिलेला असेल तो चालविण्याचा अधिकार आहे.

४७. डिस्ट्रिक्ट कोर्टानें खालीं लिहिल्याप्रमाणें हुकुम केला असेल तेव्हां, ह्मणजे— ज्या हुकुमावर अपील चालेल ते.

(अ) पालनकरणारा नेमण्याबाबद अगर ठरविण्याबाबद किंवा नमेण्यास अगर ठरविण्यास इनकार करण्याबाबद ७ व्या कलमाअन्वयें केला असेल तेव्हां, किंवा

(ब) अर्जी परत करण्याबाबद कलम ९, पोट-कलम (३) याअन्वयें केला असेल तेव्हां, किंवा

(क) वार्डास त्याच्या पालनकरणाराच्या रखवालींत परत जाण्यासाठीं हुकुम करण्याबाबद किंवा करण्यास इनकार करण्याबाबद २५ व्या कलमाअन्वयें केला असेल तेव्हां, किंवा

(ड) कोर्टाच्या अधिकाराच्या हद्दीबाहेर वार्डास नेण्याविषयीं परवानगी देण्याचा इनकार करण्याबाबद, अगर त्यासंबंधी शर्ती ठरविण्याबाबद २६ व्या कलमाअन्वयें केला असेल तेव्हां, किंवा

(ई) २८ व्या अगर २९ व्या कलमांत सांगितलेलं एकादें कृत्य करण्याची पालनकरणारास परवानगी देण्यास इनकार करण्याबाबद त्या कलमाअन्वयें केला असेल तेव्हां, किंवा

(फ) पालनकरणाराचे अधिकार ठरविण्याबाबद, कमी करण्याबाबद किंवा वाढविण्याबाबद ३२ व्या कलमाअन्वयें केला असेल तेव्हां, किंवा

(ग) पालनकरणारास काढून टाकण्याबाबद ३९ व्या कलमाअन्वयें केला असेल तेव्हां, किंवा

(ह) पालनकरणाराची कामावरून सुटका करण्यास इनकार करण्याबाबद ४० व्या कलमाअन्वयें केला असेल तेव्हां, किंवा

(आय्) पालनकरणाराच्या वर्तणुकीचें किंवा त्यानें चालविलेल्या कामांचें नियमन करण्याबाबद किंवा सामायिक पालनकरणारांमध्यें ज्या गोष्टीविषयीं मतभेद होईल तिचा निकाल करण्याबाबद, किंवा असाहुकुम अमलांत आणण्याबाबद ४३ व्या कलमाअन्वयें केला असेल तेव्हां, किंवा

(जे) शिक्षा देण्याबाबद कलम ४४ किंवा कलम ४५ याअन्वयें केला असेल तेव्हां,

त्यावर है कोर्टाकडे अपील चालेल.

४८. सदरील शेवटल्या कलमावरून, व सिव्हिल प्रोसीजर कोडाच्या ६२२ व्या कलमावरून ठरविलें आहे तेवढें खेरीज करून, या आक्टाअन्वयें केलेला हुकुम अखेरचा असून, त्याबदल दावा करून किंवा इतर रीतीनें तकरार करतां येणार नाहीं असें समजावें. इतर हुकुम अखेरचे समजणें.

४९. या आक्टाअन्वयें चालविलेल्या कोणत्याहि कामाचा खर्च, दिवाणी तुरुंगांत पालनकरणाराच्या अगर इतर मनुष्याच्या निर्वाहासाठीं येणाऱ्या खर्चासुद्धां, ठरविणें तो, या आक्टाअन्वयें है कोर्टानें ज्या कोणत्याहि कानू केल्या असतील त्यांस खर्च.

अनुसरून, तें काम ज्या कोर्टामध्यें चालविण्यांत आलें असेल त्या कोर्टाच्या नजरेस येईल त्याप्रमाणें ठरविला पाहिजे.

कानू करण्याचा हा कोर्टास अधिकार.

९०. (१) या आक्टावरून स्पष्टपणें किंवा गर्भितार्थानें जो कोणताहि कानू करण्याचा दुसरा अधिकार प्राप्त होत असेल त्याशिवाय आणखी हें कोर्टास, या आक्टास अनुरूप अशा, खालीं लिहिलेल्या गोष्टींबाबद वेळोवेळीं कानू करण्याचा अधिकार आहे, ह्मणजे,—

(अ) कोणत्या गोष्टींबाबद व कोणत्या वेळीं कलेक्टरांकडून व ताब्यांतील कोर्टांकडून रिपोर्ट अवश्य मागविले पाहिजेत याबाबद;

(ब) पालनकरणारांस द्यावयाचीं वेतनें व त्यांपासून घ्यावयाचें तारण यांबाबद आणि कोणत्या बाबतींमध्यें अशीं वेतनें अवश्य दिलीं पाहिजेत याबाबद;

(क) २८ व २९ या कलमांत सांगितलेलीं कृत्यें करण्यास परवानगी मागण्याबद्दल पालनकरणारांनीं केलेल्या अर्ज्यांच्या संबंधानें ज्या रीतीनें काम चालवावयाचें त्या रीतीबाबद;

(ड) ३४व्या कलमाच्या रकमा (अ), (ब), (क) व (ड) यांत सांगितल्या प्रकारचे हुकुम कोणत्या प्रसंगीं अवश्य केले पाहिजेत याबाबद;

(ई) पालनकरणारांनीं दिलेलीं पत्रकें व दाखविलेले हिशेब राखून ठेवण्याबाबद;

(फ) तीं पत्रकें व हिशेब हितसंबंध असलेल्या मनुष्यांनीं पाहण्याबाबद;

(ग) वार्डांच्या पैक्याच्या व पैक्याबदलच्या सिक्यूरिटींच्या रखवालीबाबद:

(ह) वार्डांचा पैका कोणत्या सिक्यूरिटींवर व्याजीं लावावा याबाबद;

(आय्) ज्या वार्डांबद्दल कलेक्टर नव्हत असे पालनकरणारे कोर्टानें नेमिले अगर ठरविले असतील त्या वार्डांच्या शिक्षणाबाबद; आणि

(जे) साधारणपणें, या आक्टाचे हेतु अमलांत आणण्याकरितां कोर्टाचीं समजूत होण्याबाबद.

(२) पोट-कलम (१) याच्या रकमा (अ) व (आय्) यांखालील कानू स्थानिक सरकाराकडून पसंत करण्यांत येत तोंपर्यंत चालणार नाहींत, व तसेंच, या कलमाखालील कोणतीहि कानू सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध होई तोंपर्यंत चालणार नाहीं असें समजावें.

कोर्टाकडून आधींच नेमण्यांत आलेल्या पालनकरणारांस आक्ट लागू करणें.

९१. जो कोणताहि कायदा या आक्टावरून रद्द झाला असेल त्या कायद्याअन्वयें एकाद्या दिवाणी कोर्टानें नेमिलेला किंवा त्या कोर्टाकडून ज्याला वहिवाटीबद्दल दाखला मिळाला आहे असा पालनकरणारा यास, फर्माविलेलें असेल तेवढें खेरीज करून, तो २र्‍या बाबीअन्वयें कोर्टानें नेमिला अगर ठरविला असल्याप्रमाणें, या आक्टांतील व या आक्टाअन्वयें केलेल्या कानूंतील ठराव लागू राहतील असें समजावें.

हिंदुस्तानचा व्यवहार्य वयासंबंधी आक्ट याची सुधारणा.

९२. हिंदुस्तानचा व्यवहार्य वयासंबंधी सन १८७५ चा आक्ट याच्या ३ र्‍या कलमांत, "ज्या ज्या अल्पवयी मनुष्यासाठीं किंवा ज्या ज्या अल्पवयी मनुष्याचे मालमिळकतीसाठीं इन्साफाचे कोणतेहि कोर्टाकडून पालनकरणारा नेमला असेल किंवा नेमण्यांत येईल त्या त्या अल्पवयी मनुष्याचें आणि कोणतेहि कोर्ट आफ् वार्डचे हुकुमतींतील प्रत्येक अल्पवयी मनुष्याचें" या शब्दांच्याबदला पुढील शब्द दाखल करावे. ते येणेंप्रमाणें:—

"ज्या अल्पवयी मनुष्याच्या शरीराचा किंवा मालमिळकतीचा किंवा त्या दोहीं-चा, सिव्हिल प्रोसीजर कोडाच्या ३१ व्या बाबीच्या अर्थानुसारें दाव्याबद्दलच्या पालन करणाराखेरीज इतर पालनकरणारा, त्या अल्पवयी मनुष्याचें अठरा वर्षांचें वय होण्यापूर्वी इनसाफाच्या कोणत्याहि कोर्टाकडून नेमण्यांत अगर ठरविण्यांत आला असेल किंवा नेमण्यांत अगर ठरविण्यांत येईल तशा दरेक अल्पवयी मनुष्याचें, आणि ज्या अल्पवयी मनुष्याच्या मालमिळकतीच्या देखरेखीचें काम कोणतेंहि कोर्ट आफ् वार्ड्स याजकडून, तें अल्पवयी मनुष्य सदरील वयाचें होण्यापूर्वी, आपणाकडे घेण्यांत आलें असेल अगर घेण्यांत येईल तशा दरेक अल्पवयी मनुष्याचें."

९३. सिव्हिल प्रोसीजर कोडाच्या ३१ व्या बाबीची पुढीलप्रमाणें सुधारणा करावी. ती येणेंप्रमाणें:— सिव्हिल प्रोसिजर कोडाच्या ३१ व्या बाबीची सुधारणा.

अ.—सदर्हू कोडाच्या ४४० व्या कलमाच्या शेवटीं पुढील मजकूर जास्त दाखल करावा. तो येणेंप्रमाणें:—

"पालनकरणारा नेमण्याविषयीं अगर ठरविण्याविषयीं अखत्यार असणाऱ्या अधिकाऱ्यानें कोणत्याहि एकाद्या अल्पवयीमुलाचा पालनकरणारा नेमिला अगर ठरविला असेल, तर त्या अल्पवयीमुलाच्या वतीनें कोणताहि दावा मांडणें तो, सदरहू पालनकरणाराखेरीज इतर कोणत्याहि मनुष्यानें, कोर्टाकडून अशा पालनकरणारास नोटीस देण्यांत आल्यानंतर व असा दावा मांडण्याच्या संबंधानें तो कोणत्याहि हरकती आणूं इच्छीत असल्यास त्या ऐकून घेतल्यानंतर मग मिळालेल्या कोर्टाच्या परवानगीवांचून, मांडतां कामा नये, आणि कोर्टानें अशी परवानगी देणें ती, सदरहू अल्पवयीमुलाच्या नांवें दावा मांडण्याचा इरादा करणाऱ्या मनुष्यास ती मांडूं देणें हें त्या अल्पवयीमुलाच्या कल्याणाचें आहे असें कोर्टास वाटल्यावेरीज, देऊं नये."

ब.—सदरील कोडाच्या ४४३ व्या कलमाच्या शेवटीं पुढील मजकूर जास्त दाखल करावा. तो येणेंप्रमाणें:—

"पालनकरणारा नेमण्याविषयीं अगर ठरविण्याविषयीं अखत्यार असणाऱ्या अधिकाऱ्यानें, अल्पवयीमुलाच्या शरीराचा अगर मिळकतीचा किंवा त्या दोहींचा पालनकरणारा अगर पालनकरणारे नेमिले अगर ठरविले असतील त्या प्रसंगीं, या कलमाअन्वयें दाव्यापुरता पालनकरणारा नेमणें तो, प्रसंगाप्रमाणें, सदरील पालनकरणारास अगर पालनकरणारांपैकीं एकास कोर्टानें नेमिलें पाहिजे, परंतु कांहीं कारणांवरून कोर्टास दुसरा कोणता तरी मनुष्य नेमावा असें वाटत असल्यास त्यानें त्याला नेमावें, मात्र कोर्टानें अशीं कारणें लिहून ठेवावीं."

क.—सदर्हू कोडाच्या ४४६ व्या कलमाच्या शेवटीं पुढील मजकूर जास्त दाखल करावा. तो येणेंप्रमाणें:—

"जर सदरील इष्टमित्र हा, पालनकरणारा नेमण्याविषयीं अगर ठरविण्याविषयीं अखत्यार असणाऱ्या अधिकाऱ्यानें नेमलेला अगर ठरविलेला पालनकरणारा नसेल, आणि सदरहूप्रमाणें नेमलेल्या अगर ठरविलेल्या कोणत्याहि पालनकरणारानें त्या इष्टमित्राच्या जागीं आपली स्वतःची नेमणूक व्हावी अशी इच्छा दर्शवून अर्ज केलेला असेल तर, कोर्टानें सदरील इष्टमित्रास कामावरून दूर केलें पाहिजे, परंतु कांहीं कारणांवरून कोर्टास सदरहू पालनकरणाराला त्या इष्टमित्राच्या जागीं नेमूं नये असें वाटत असल्यास त्यानें त्या इष्टमित्रास कामावरून दूर करूं नये, मात्र अशीं कारणें कोर्टानें लिहून ठेवावीं."

ड.—सदरील कोडाच्या ४६१ व्या कलमाच्याबदला पुढील कलम दाखल करावें. तें येणेंप्रमाणें:—

इष्टमित्रानें अगर दाव्यापुरता असणाऱ्या पालनकरणारानें अल्पवयीमुलाच्या तर्फेच्या हुकुमनाम्याअन्वयें मिळकत घेण्याबाबद.

"४६१. (१) इष्टमित्रानें अगर दाव्यापुरता असणाऱ्या पालनकरणारानें, कोर्टाच्या परवानगीवांचून, अल्पवयीमुलाच्या वतीने कोणताहि पैका अगर इतर जंगम मिळकत—

(अ) हुकुमनामा अगर हुकुम होण्यापूर्वी तोडजोड करून, किंवा

(ब) सदरहू अल्पवयीमुलाच्या तर्फे झालेल्या हुकुमनाम्याअन्वयें अगर हुकुमाअन्वयें,

घेऊं नये.

"(२) जेव्हां सदरील इष्टमित्र अगर दाव्यापुरता पालनकरणारा हा अल्पवयीमुलाच्या मिळकतीचा पालनकरणारा योग्य अखत्यार असणाऱ्या अधिकाऱ्यानें नेमलेला अगर ठरविलेला नसेल, किंवा तो याप्रमाणें नेमलेला अगर ठरविलेला असून, सदरील पैका अगर इतर जंगम मिळकत घेण्यास कोर्टास माहीत असणाऱ्या कोणत्याहि कारणावरून नालायक असेल, त्या प्रसंगीं कोर्टानें सदरहू पैका व मिळकत घेण्याविषयीं त्याला परवानगी दिली असतां, अशा पैक्याची अगर मिळकतीची खराबी न होण्यासाठीं व त्यांचा योग्य विनियोग होण्यासाठीं कोर्टास पुरता वाटेल तसा जामीन त्यानें मागितला पाहिजे व तसे हुकुम दिले पाहिजेत."

ई.—सिव्हिल प्रोसीजर कोड सुधारण्याविषयींचा सन १८८८ चा आक्ट यावरून सुधारलेल्या सदरील कोडाच्या ४६४ व्या कलमाबदल पुढील कलम दाखल करावें. तें येणेंप्रमाणें:—

राजे व रजवाडे आणि कोर्टाच्या दिमतींतले लोक.

"४६४. या बाबींतील कोणताहि मजकूर, जो कोणताहि सत्ताधिकारी राजा किंवा कारभार चालविणारा रजवाडा आपल्या संस्थानाच्या नांवानें दावा करील, अगर ज्यावर त्याच्या संस्थानाच्या नांवानें, किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल अगर स्थानिक सरकार यांच्या हुकुमावरून, एकाद्या मुखत्याराच्या नांवानें अगर इतर कोणत्याहि नांवानें दावा करण्यांत येईल, त्यास लागू होणार नाहीं, अथवा त्या मजकुरावरून, अल्पवयीमुलांनीं अगर मुलांवर किंवा वेडे अगर इतर अधू मनाचीं मनुष्यें यांनीं अगर यांजवर केलेल्या दाव्यांसंबंधी त्या त्या वेळीं अमलांत असणाऱ्या स्थलविशेषाच्या कोणत्याहि कायद्यांतील ठरावांस बाध अगर कोणत्याहि प्रकारें कमीपणा येतो असें समजूं नये."

---

## परिशिष्ट.

### कायदे रद्द केले ते.

( कलम २ पहा.)

| नंबर व साल. | सरनामा अगर विषय. | किती रद्द केला तें. |
|---|---|---|
| | गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचे आक्ट. | |
| १८९८ चा १४. } मुंबई इलाख्यास<br>१८९८ चा ४०. } लागू नाहींत. | | |
| १८६१ चा ९ ... ... | अल्पवयीमुलें ... ... | सगळा. |
| १८६४ चा २० ... ... | अल्पवयीमुलें (मुंबई)... ... | सगळा. |

| नंबर व साल. | सरनामा अगर विषय. | किती रद्द केला तें. |
|---|---|---|
| १८६९ चा १४ ... ... | सन १८६९ चा मुंबईचा दिवाणी कोर्टाबाबद आक्ट. | १६ व्या कलमांतील शेवटच्या पारिग्राफाचा जेवढा भाग रद्द झालेला नसेल तेवढा. |
| १८७० चा ७ ... ... | सन १८७० चा कोर्टाचे फीचा आक्ट. | कलम १९ ह व १ ल्या परिशिष्टाचें कलम १०. |
| १८७२ चा ४. <br> १८७३ चा १९. } मुंबई इलाक्यास लागू नाहींत. | | |
| १८७४ चा १३ ... ... | सन १८७४ चा यूरोपीयन ब्रिटिश अल्पवयीमुलांबाबद आक्ट. | सगळा. |
| १८७४ चा १५ ... ... | सन १८७४ चा कायद्यांच्या स्थानिक व्याप्तीबाबद आक्ट. | या आक्टावरून रद्द झालेल्या कोणत्याहि कायद्याशीं जेवढ्या भागाचा संबंध असेल तेवढा. |
| १८७५ चा २०. <br> १८७६ चा १८. <br> १८७९ चा १३. } मुंबई इलाक्यास लागू नाहींत. | | |
| १८८२ चा १४ ... ... | दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयीं कायदा. | ४४३ व्या कलमाचा दुसरा पारिग्राफ. |
| १८८४ चा १८. <br> १८८५ चा १७. <br> १८८७ चा १२. <br> १८८९ चा ११. } मुंबई इलाक्यास लागू नाहींत. | | |

## मद्रासचे कायदे.

[मुं. इ. लागू नाहींत.]

## स्टाटूट ३३ व्हिक्टोरिया, चापटर ३ अन्वयें कायदे.

[मुं. इ. लागू नाहींत.]

(True Translation)

Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS